MHKO100003862022

**नियमीत दिवाणी दावा क्र. ९४/२०२२**

संग्राम नौकुडकर.
//वि//
शाखा व्यवस्थापक, आयडीबीआय बँक
वगैरे.

**निशाणी क्र. १७ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटप व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ हा दिनांक २१/०९/२०२४ रोजी आपले वकीलांमार्फत हजर झाला. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे, त्यांचेविरुध्द दिनांक ०७/०३/२०२५ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जात असे कारण नमुद केलेले आहे की, प्रतिवादी क्र.२ हा बी.टेक. च्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असुन डिसेंबर २०२४ मध्ये विद्यापिठामार्फत घेण्यात येणा-या परीक्षेच्या तयारीकरिता प्रतिवादी क्र.२ हा त्याच्या अभ्यासात व्यस्त होता. तसेच, डिसेंबर २०२४ मध्ये देखील त्याची परीक्षा होती. या कारणास्तव त्याला त्याचे वकीलांची भेट घेऊन कैफियत देणेकरीता आवश्यक ती माहिती व कागदपत्रे देता आली नाहीत. त्यामुळे, त्यांना मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. प्रत्यक्षात सदर कारणे व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी दिलेले कारणे संयुक्तीक नाहीत. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे स्वरुप पाहता प्रतिवादींची प्रस्तुत दाव्याकामी कैफियत व म्हणणे अभिलेखावर येणे दाव्याच्या गुणदोषावर निकालासाठी आवश्यक आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादी क्र.२ याचा प्रस्तुतचा अर्ज खर्च लावून मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## -: आदेश :-

०१. अर्ज रक्कम रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.२ यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला).

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2025.07.22 14:50:12 +0530

**( एस. डी. मेहता )**

गडहिंग्लज.

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

दिनांकः २१/०७/२०२५.

:: **CERTIFICATE** ::

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. D. Mehta,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 21/07/2025 |
| Order signed by P.O. on | 21/07/2025 |
| Order uploaded on | 22/07/2025 |